# निशाणी ७८ वर आदेश नियमित दिवाणी दावा नं. ११६/२०१२

प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या विरूध्द झालेला नो क्रॉसचा आदेश रद्द होवून मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादीने असे नमूद केले आहे की, जुनी कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे दि. ०१/१२/२०१८ रोजी त्यांच्या विरूध्द नो क्रॉसचा आदेश पारीत करण्यात आला. परंतु न्यायाच्या दुष्टीने वादी नं. २ चा उलटतपास घेणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी विरूध्द झालेला नो क्रॉसचा आदेश रद्द करण्यात यावा अशी विनंती केली.

वादी यांचे वकिलांनी आपले म्हणणे सादर केले व असे म्हटले की, अर्जातील सर्व मजकूर खोटा व काल्पनिक आहे. वादीने फार पूर्वी शपथपत्र दिले आहे. प्रतिवादी मुद्दाम चौकशीचे काम लांबणीवर पडावे म्हणून वेगवेगळे अर्ज देतात. पुराव्याचे शपथपत्र दि. २५/१०/२०१३ ला दिलेला आहे. वादी ही असाहाय्य विधवा आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास ३,०००/— रूपये कॉस्टवर मंजूर करण्यात यावे.

दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर असे दिसून येते की, प्रतिवादी नं. १ व २ यांच्या विरोधात दि. ०१/१२/२०१८ रोजी नो क्रॉसचा आदेश पारीत करण्यात आला आहे. परंतु दाव्याचा निकाल गुणदोषावर लागण्याकरिता प्रतिवादी यांना एक संधी देणे न्यायोचित होईल. त्याचबरोबर जर कॉस्ट लावल्यास ते न्यायोचित होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार प्रतिवादी नं. १ व २ यांच्या विरूध्द पारीत करण्यात आलेला नो क्रॉसचा आदेश रू. ५००/— कॉस्टवर रद्द करण्यात येतो. व प्रतिवादी नं. १ व २ यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी पुढील तारखेस न चुकता उलटतपास घ्यावे.

दिनांक — २६.०६.२०१९

एस. एन. रोकडे.<br>
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,<br>
बार्शी

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | M.P.Gheradi (L.G) |
| Court | :- | 2nd Jt. Civil Court,S.D.,Barshi. |
| Date | :- | 26/06/2019 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 26/06/2019 |
| Judgment/Order uploaded on | :- | 27/06/2019 |